**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सार्वजनिक आरोग्य खाते

HO/3494A/R2 दि.03.09.2025

**जाहिरात**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील जन्म-मृत्यू नोंदणी विभाग कार्यालय येथे खालील तक्त्यात नमूद संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/ एफ /6962 दि. 25.06.2025 अन्वये दि. 01.10.2025 ते 31.03.2027 या कालावधीकरीता प्रत्येकी 179 दिवसानंतर 01 दिवसाचा सेवा खंड देऊन **कंत्राटी** तत्वावर किंवा प्रकल्पाचे काम चालू असेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल एवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याकरिता मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने खालील अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करणा-या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदे **कंत्राटी तत्वावर** आवश्यकतेप्रमाणे भरली जातील.

| अ.क्र | पदनाम | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| 1 | वैदयकीय कोडर | 06 |
| 2 | हेल्थ डेटा मॅनेजर | 03 |
| 3 | डेटा एंट्री ऑपरेटर | 03 |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण **जाहिरात अटी व शर्ती** सह तसेच **वैयक्तिक माहितीपत्र** प्रसिध्द करण्यात येत आहे. संकेतस्थळावरील जाहीरातीला अनुसरुन विहित अर्हता व अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म https://bit.ly/CoderRecruitment या गुगल लिंकद्वारे दि. 08.09.2025 ते 19.09.2025 (सायंकाळी 05.30 वाजे पर्यंत) अर्ज भरावयाचे आहेत तसेच अर्ज व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती साक्षांकित व छायांकित प्रतीसह कागदपत्रांच्या पडताळणीसाठी घेऊन यावे. दूरध्वनीद्वारे कोणतीही माहिती कळविली जाणार नाही. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात तसेच **सोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात तसेच सोबत जोडण्यात आलेले विहीत नमून्यातील वैयक्तिक माहितीप्रपत्र** उमेदवारांनी पडताळणीच्यावेळी सादर करावे. **उमेदवारांची निवड यादी दि. 29.09.2025 रोजी सूचनाफलकावर प्रसारित केली जाईल.**

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| (सहा. आरोग्य अधिकारी)<br>(जन्म मृत्यू नोंदणी विभाग) | (उप कार्यकारी आरोग्य अधिकारी)<br>(जन्म मृत्यू नोंदणी विभाग) | (उप कार्यकारी आरोग्य अधिकारी)<br>(मुख्यालय) | (कार्यकारी आरोग्य अधिकारी)<br>(सार्वजनिक आरोग्य खाते) |

## <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

### <u>सार्वजनिक आरोग्य खाते</u>

HO/3494A/R2 Dt.03.09.2025

सार्वजनिक आरोग्य खाते अंतर्गत जन्म मृत्यू नोंदणी विभाग व इतर विभागाकरीता मृत्यू कारण सांकेतिक काम / प्रकल्पाकरीता व आरोग्य खाते मधील इतर विभागाच्या कामासाठी कंत्राटी पदे, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव व कंत्राटी वेतन (मानधन) तपशील खालीलप्रमाणे:-

| अ क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | वयोमर्यादा | मानधन | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय कोडर | 06 | 18 ते 43 वर्षे | रु. 29,700/- | 1. बी. एस. सी - बायोलॉजीकल सायन्स / लाईफ सायन्स / बी. एस. सी (बायोलॉजी) – किमान **55%** गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर / निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. | मृत्यू कारण सांकेतिक कामांचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| 2 | हेल्थ डेटा मॅनेजर | 03 | 18 ते 43 वर्षे | रु. 60,000/- | 1. M.Sc.- Health Informatics<br>OR<br>2. M.Sc – Biostatistics<br>OR<br>3. BE/ B.Tech - Biomedical Engg.<br>4. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर / निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. | 1.आरोग्य खाते अंतर्गत Health Statistics & Analysis मधील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>2. My SQL & Microsoft Access Experience in Interoperable Database Analysis & Development, Managing a Complex, Multi Party Project, Ability to work independently. |
| 3 | डेटा एंट्री ऑपरेटर | 03 | 18 ते 43 वर्षे | रु. 20,000/- | 1. कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>2. इंग्रजी 40 श. प्र. मि. व मराठी टायपिंग 30 श. प्र. मि.<br>3. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे 'सी.सी.सी' किंवा 'ओ-स्तर' किंवा 'ए-स्तर' किंवा 'बी-स्तर' किंवा 'सी-स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम एस सी आय टी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र | MS office, Excel, Power Point मधील कामाचा अनुभव. मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.<br>4. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर / निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. | |
| | एकूण पदे | 12 | | | | |

| | |
|---|---|
| अटी व शर्ती | 1. कंत्राटी वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ डेटा एंट्री ऑपरेटर हे तत्सम पदाकरीता विहीत केलेल्या अर्हता धारण करणारे असावे.<br>2. कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही, तसेच भविष्यात त्यांना वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ संगणक चालक या पदावर हक्क सांगता येणार नाही.<br>3. कंत्राटी पध्दतीवरील वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ डेटा एंट्री ऑपरेटर यांना रु.500/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा सादर करावा लागेल.<br>4. कंत्राटी वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ डेटा एंट्री ऑपरेटर यांना वर नमूद केल्या प्रमाणे प्रति महिना निश्चित मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.<br>5. मानधनाची रक्कम कंत्राटी वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त करण्यात येणा-या संबंधित आस्थापनेच्या योग्य त्या अर्थसंकल्पीय शिर्षातून भागविण्यात येईल.<br>6. साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी अनुज्ञेय आहे. तसेच, उपरोक्त कंत्राट कालावधीत त्यांना समप्रमाणात 7 1/2 नैमित्तिक रजा अनुज्ञेय आहे. याव्यतिरिक्त त्यांना कोणत्याही प्रकारची रजा अनुज्ञेय राहणार नाहीत.<br>7. कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या या एकावेळी 179 दिवस किंवा प्रकल्पाचे काम चालू राहे पर्यन्त किवा कामास मंजूरी असे पर्यन्त यापैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असतील. सदर प्रकल्प बंद झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना असतील.<br>8. कराराच्या कालावधीत संबंधित वैद्यकीय कोडर/ हेल्थ डेटा मॅनेजर/ डेटा एंट्री ऑपरेटर यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.<br>9. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली अटी व शर्ती खाली ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. अथवा त्या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाहीत.<br>10. कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास, अथवा संबंधित आस्थापना प्रमुखांच्या शिफारशीने असमाधनकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.<br>11. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणतेही रुग्णालय / दवाखाना / विभाग कार्यालये/ प्रसुतीगृहे / सेंटिनल सेंटर येथे नियुक्ती करण्यात येईल व आवश्यक तेथे त्यांना काम करावे लागेल.<br>12 . त्यांची नेमणुक करार पध्दतीची असल्याने त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही. तसेच, त्यांना महानगरपालिकेत नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही. |

| | |
|---|---|
| | 13. सदर उमेदवारांसाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.<br>14. उमेदवाराची नेमणूक कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात 179 दिवस असेल. आवश्यकता भासल्यास व कंत्राटी काम समाधान कारक असल्यास त्यानंतर सदर कंत्राट तत्वावरील नियुक्ती 1 दिवसाचा सेवाखंड देऊन पुढील 179 दिवसाकरिता कंत्राटी तत्वावर नव्याने नियुक्ती देण्यात येईल.<br>15. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता ( पिनकोड सह ) सुस्पष्ट व पूर्ण असावा.<br>16. पात्र उमेदवारांनी कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र प्रमाणपत्र सादर करावे.<br>17. महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसे नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.<br>18. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.<br>19. निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.<br>20 . निवड यादी सार्वजनिक आरोग्य खात्याच्या सूचनाफलकावर प्रसारित करण्यात येईल.<br>21. सार्वजनिक आरोग्य खात्यात यापूर्वी सदर पदावर काम केलेल्या उमेदवारांच्याबाबत काही तक्रार या पूर्वी अथवा सद्यस्थितीत प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची शहनिशा करुन सदर उमेदवारास पात्र अथवा अपात्र ठरविण्याचे अधिकार कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना असतील.<br>22. कंत्राटी पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना आहेत.<br>23. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महापालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाहीत.<br>24. उमेदवाराचे वय दि .1/9/2005 रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 43 वर्षा पेक्षा जास्त नसावे.<br>25. ज्या दिवशी कर्मचारी विना परवानगी गैर हजर राहिल्यास त्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल. |
| **विशेष सुचना** | 1. सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त 6 महिन्याचा राहील. (आवश्यकतेनुसार 179 दिवसांनंतर 1 दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल व त्यानंतर पुन्हा नव्याने नियुक्ती करण्यात येईल).<br>2. कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेल्या उमेदवारांची सेवा त्यांना पूर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.<br>3. कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पूरत्या स्वरुपाची असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही.<br>4. निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्या प्रमाणे 500 /- रुपयाच्या बॉन्ड पेपरवर करारनामा द्यावा लागेल.<br>5. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले व पोष्टाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे,स्विकारणे इत्यांदीचा अधिकार दिलेला नाही,याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.<br>6. जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.<br>7. मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांचा गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.<br>8. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचे अधिकार मुंबई महापालिका आयुक्त यांना आहेत.<br>9. सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहिरातीनुसार गुगल फॉर्मद्वारे अर्ज करावा लागेल.<br>10. गुणवत्तेनुसार स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल परंतु अंतिम निर्णय प्रशासनाचा राहील. |

| | |
|---|---|
| | 11. विहीत अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी गुगल फॉर्मद्वारे अर्ज भरण्यात यावेत. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे अर्ज केल्यास सदर अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| **निवडीचे निकष** | 1) सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हतेनुसार व गुणवत्तेच्याआधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.<br>2) शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल. समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल. समान जन्मतारिख असल्यास,उमेदवारांच्या आडनावातील इंग्रजी वर्णमालेतील आद्याक्षरानुसार प्राधान्य देण्यात येईल.<br>3) उमेदवाराच्या पदस्थापनेबाबतचे व निवडीच्या निकषामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. |

सही/-

(सहा. आरोग्य अधिकारी)
(जन्म मृत्यू नोंदणी विभाग)

सही/-

(उप कार्यकारी आरोग्य अधिकारी)
(जन्म मृत्यू नोंदणी विभाग)

सही/-

(उप कार्यकारी आरोग्य अधिकारी)
(मुख्यालय)

सही/-

(कार्यकारी आरोग्य अधिकारी)
सार्वजनिक आरोग्य खाते